विद्यापीठ अनुदान आयोग UGC NET (LIS) परीक्षेतील प्रश्नपत्रिकेचे बदलते स्वरूप: विद्यार्थ्यांची रणनीती

डॉ. अशोक कोलंबीकर
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा
ई-मेल: ashokkolambikar@gmail.com

प्रा. भालेराव संजीवनी बालाजी
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, उदगीर जि. परभणी

सारांश (Abstract) :

विद्यापीठ अनुदान आयोग UGC NET ही भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्र (Library and Information Science) क्षेत्रातील अध्यापन व संशोधनासाठी महत्त्वाची पात्रता परीक्षा आहे. 2010 ते 2025 या 15 वर्षांच्या कालखंडात या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत लक्षणीय बदल झाल्याचे आढळून आले आहे. पारंपरिक व मूलभूत विषयांपासून ते आधुनिक तंत्रज्ञानाधारित घटकांपर्यंत प्रश्नांची व्याप्ती विस्तारली आहे. 2010 ते 2025 या कालावधीत NTA द्वारे घेतल्या गेलेल्या Paper-II (LIS) विषयक प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण केले असून त्यामधील युनिटनिहाय प्रश्नांचे वितरण, पुनरावृत्त होणारे प्रश्न, अवघडतेचे स्तर, आणि ICT, Research, Open Access यांसारख्या नव्या घटकांचा समावेश अभ्यासला गेला आहे. याशिवाय, विद्यार्थ्यांची तयारी करण्याची पद्धत, डिजिटल साधनांचा वापर, व नवी रणनीती यावरही सर्वेक्षणाद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे. हे विश्लेषण भविष्यातील उमेदवारांना परीक्षेच्या ट्रेंड समजून घेण्यास व त्यानुसार तयारी करण्यास उपयुक्त ठरेल. ही अभ्यासविषयक लेखरचना UGC NET (Library and Information Science) परीक्षेच्या तयारीसाठी वापरल्या जाणाऱ्या डिजिटल साधनांचा वापर, परीक्षार्थींचे अनुभव व त्यावरील परिणामांचा अभ्यास करते. शिवाय, 100 विद्यार्थ्यांवर आधारित सर्वेक्षणातून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांचा कल डिजिटल शिक्षण माध्यमांकडे अधिक आहे, आणि प्रभावी तयारीसाठी एकत्रित (Blended Learning) पद्धतीचा अवलंब, विश्वासार्ह डिजिटल पोर्टल्सची निर्मिती, तसेच सामूहिक चर्चासत्रांचा उपयोग हे भविष्यकालीन धोरणात्मक उपाय ठरू शकतात.

शोधसंज्ञा (Keywords) : UGC NET (LIS), डिजिटल लायब्ररी , बदलते स्वरूप, परीक्षा रणनीती, पेपर पॅटर्न, डिजिटल साधनांचा वापर, MCQ स्वरूप, अभ्यासक्रमातील बदल.

प्रस्तावना (Introduction):

UGC NET (University Grants Commission - National Eligibility Test) ही भारत सरकारची एक प्रतिष्ठित पात्रता परीक्षा आहे, जी महाविद्यालयीन अध्यापन व संशोधनासाठी सहाय्यक प्राध्यापक (Assistant Professor) व कनिष्ठ संशोधन फेलोशिप (JRF) पात्रता निश्चित करते. ग्रंथालय व माहितीशास्त्र (Library and Information Science – LIS) ही एक गतिशील व बहुविध शाखा असून त्यातील NET परीक्षा विविध शैक्षणिक व तांत्रिक घटकांवर आधारित असते. सन 2010 पासून ते आजपर्यंत, UGC NET (LIS)

Research Hub International Journal

परीक्षेमध्ये विषयाच्या स्वरूपात, प्रश्नांची रचना, आणि परीक्षेचे माध्यम (ऑनलाइन) यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. पूर्वीच्या प्रश्नपत्रिकेत अधिक प्रमाणात पारंपरिक ग्रंथालय व्यवस्थापन, वर्गीकरण, संदर्भ सेवा, इ. घटक केंद्रस्थानी होते, तर अलीकडील काळात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), डिजिटल लायब्ररी, ओपन ऍक्सेस, नीतिशास्त्र, संशोधन पद्धती, आणि इन्फर्मेटिक्स या आधुनिक विषयांवर आधारित प्रश्न अधिक प्रमाणात दिसतात.

परीक्षेच्या स्वरूपातही लक्षणीय बदल घडले आहेत — जसे की, MCQ स्वरूप, ऑनलाईन परीक्षा पद्धत, वेळेचे नियोजन, नकारात्मक गुण नसणे, वगैरे. विद्यार्थ्यांची तयारीदेखील बदललेल्या स्वरूपानुसार बदलत गेली आहे. यामध्ये YouTube lectures, online test series, Telegram group discussions, आणि eBooks सारख्या डिजिटल माध्यमांचा प्रभाव वाढला दिसून येत आहे. अशा परिस्थितीत, मागील १५ वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा विश्लेषणात्मक अभ्यास केल्यास परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पष्ट ट्रेंड समजू शकतो. कोणते घटक वारंवार विचारले जातात? कुठल्या युनिटचा भर वाढला आहे? आणि विद्यार्थ्यांनी कोणती रणनीती आखावी, याचे मार्गदर्शन मिळते. या लेखामध्ये 2010 ते 2025 या कालावधीतील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करून बदलत्या प्रवाहांची नोंद घेतली आहे. यासोबतच निवडक NET परीक्षार्थ्यांशी केलेल्या संवादाच्या आधारे त्यांची अभ्यासपद्धती, ऑनलाइन साधनांचा वापर, आणि तयारीचे बदलते स्वरूप याचेही सखोल निरीक्षण करण्यात आले आहे.

पूर्वसाहित्याचा आढावा :

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र क्षेत्रात डिजिटल शिक्षण आणि ICT चा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. भारतात MOOCs (Massive Open Online Courses) चा उपयोग या क्षेत्रात कसा होतो आहे, याचा अभ्यास Gupta आणि Kabra (2020) यांनी "MOOCs in Library and Information Science in India" या संशोधनात सविस्तरपणे मांडलेला आहे. त्यांनी असे नमूद केले की विद्यार्थ्यांना गुणवत्ता असलेले शिक्षण आणि प्रमाणपत्र मिळवण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म्स अत्यंत उपयुक्त ठरले आहेत. Kumar आणि Garg (2020) यांनी उच्च शिक्षणातील डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म्सचे मूल्यांकन करताना असे सांगितले की, SWAYAM, NPTEL आणि इतर प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेले अभ्यासक्रम अभ्यासकांसाठी प्रभावी ठरत आहेत. त्याच अनुषंगाने, Lihitkar et al. (2013) यांनी जागतिक स्तरावरील E-learning initiatives चा अभ्यास करताना भारतातील अंमलबजावणीत असलेली आव्हाने उघड केली आहेत.

Mukherjee आणि Patra (2023) यांनी भारतातील डिजिटल लायब्ररी उपक्रमांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांनी National Digital Library of India (NDLI) व e-ShodhSindhu यांसारख्या डिजिटल संसाधनांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्याचबरोबर, Pal (2012) यांनी "Role of Digital Libraries in Distance Education" मध्ये डिजिटल लायब्ररींची भूमिका स्पष्ट केली आहे. Subaveerapandiyan आणि सहलेखकांनी दोन वेगवेगळ्या अभ्यासांमध्ये SWAYAM कोर्सेसचा वापर आणि E-Resource Management व त्यासंबंधित आव्हानांचा अभ्यास केला आहे (2022). या अभ्यासांतून असे दिसते की ग्रंथालय विज्ञानाच्या विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल शिक्षणाबद्दल जागरूकता वाढते आहे.

Sridevi आणि Babu (2018) यांनी ग्रंथालयशास्त्रात ICT चा एकात्मिक वापर उच्च शिक्षणात कसा

प्रभाव टाकतो हे स्पष्ट केले आहे. ICT आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा शैक्षणिक दृष्टिकोनातून विचार केल्यास, याचे परिणाम अनेक स्तरांवर दिसून येतात – ज्ञानप्रसार, प्रवेशजोगता, व कौशल्य विकास या बाबींमध्ये. शासकीय पातळीवर, "SWAYAM", "NPTEL", "e-ShodhSindhu" आणि NDLI हे प्लॅटफॉर्म्स शैक्षणिक सामग्री मुक्त स्वरूपात देत आहेत (Ministry of Education, Govt. of India, 2017–2025). यामध्ये ऑनलाइन अभ्यासक्रम, व्हिडीओ लेक्चर्स, PDF नोंदी, चाचण्या व इतर साधनांचा समावेश आहे. माध्यमांची दखल घेणाऱ्या बातम्यांमधूनही डिजिटल ग्रंथालयांची वाढती गरज दिसून येते. Times of India (2025) च्या वृत्तांनुसार, राज्यातील विश्वविद्यालयांना डिजिटल संसाधनांनी सुसज्ज करण्याचा सल्ला राज्यपालांनी दिला आहे. तसेच संस्कृत विद्यापीठांमध्ये एकत्रित डिजिटल ग्रंथालय उभारण्याच्या उपक्रमाची नोंद घेतली गेली आहे.

वरील अभ्यासांतून स्पष्ट होते की, ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासक व व्यावसायिकांमध्ये डिजिटल माध्यमांचा वापर आणि स्वीकार वाढत आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतींसह आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा एकात्मिक वापर ज्ञानप्राप्तीचा नवा मार्ग निर्माण करत आहे.

अभ्यासाची गरज (Need of the Study) :

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र (Library and Information Science – LIS) क्षेत्रात अध्यापन व संशोधनासाठी UGC NET ही एक अत्यंत महत्त्वाची व मान्यताप्राप्त पात्रता परीक्षा आहे. या परीक्षेमार्फत हजारो विद्यार्थ्यांना शिक्षकी आणि संशोधन क्षेत्रात प्रवेश मिळतो. गेल्या १५ वर्षांत (2010 ते 2025) या परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, आणि प्रश्नपद्धतीत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत. या कालावधीत पारंपरिक पुस्तककेंद्रित शिक्षणापासून ते डिजिटल लायब्ररी, ओपन ॲक्सेस, माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), संशोधन पद्धती, आणि डेटा विश्लेषणासारख्या आधुनिक संकल्पनांचा समावेश वाढला आहे. यामुळे परीक्षार्थींनी वापरणाऱ्या तयारीच्या साधनांमध्येही लक्षणीय बदल झाला आहे. पूर्वी छापील पुस्तकांवर अवलंबून राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी आता ऑनलाइन कोर्सेस, YouTube चॅनेल्स, डिजिटल टेस्ट सिरीज, मोबाईल ॲप्स, आणि ई-लर्निंग प्लॅटफॉर्मकडे वळण सुरू केले आहे. परंतु या बदलत्या घटकांचा सर्वांगीण आणि कालानुक्रमिक अभ्यास फारसा झालेला नाही. परीक्षेतील ट्रेंड, युनिटनिहाय विचारले जाणारे प्रश्न, पुनरावृत्त होणारे विषय, आणि त्यानुसार विद्यार्थ्यांनी स्वीकारलेल्या रणनीतींचे शास्त्रीय विश्लेषण करणे ही काळाची गरज आहे.

या अभ्यासामुळे:

- विद्यार्थ्यांना परीक्षेचा ट्रेंड समजेल.
- अभ्यासाची दिशा ठरवता येईल,
- डिजिटल युगात योग्य तयारीची रणनीती आखता येईल.

त्यामुळे या विशिष्ट कालावधीत (2010–2025) झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे व त्यावर आधारित मार्गदर्शन प्रदान करणे अत्यावश्यक झाले आहे. हा लेख त्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study) :

या अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ट UGC NET (Library and Information Science) परीक्षेतील 2010 ते

Research Hub International Journal

2025 दरम्यान घडलेल्या बदलांचा विश्लेषण करणे आणि त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या तयारीच्या पद्धतींमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करणे हे आहे. अभ्यासाचे विशिष्ट उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

1. 2010 ते 2025 या कालावधीत UGC NET (LIS) परीक्षेतील प्रश्नपत्रिकेतील घटकांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. प्रश्नांची युनिटनिहाय (Unit-wise) विभागणी, महत्त्वाचे घटक, आणि वारंवार विचारले जाणारे विषय ओळखणे.
3. पारंपरिक व आधुनिक घटकांमधील संतुलन समजून घेणे – जसे की पुस्तकाधारित सेवांविरुद्ध डिजिटल तंत्रज्ञानावरील प्रश्न.
4. विद्यार्थ्यांच्या तयारीच्या रणनीती, विशेषतः डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म्स, मोबाईल ॲप्स, ऑनलाइन टेस्ट सिरीज व YouTube चॅनेल्स यांचा वापर कसा वाढला हे समजून घेणे.
5. विद्यार्थ्यांच्या अभिप्रायावर आधारित, परीक्षेच्या बदलत्या स्वरूपानुसार तयारीसाठी उपयुक्त मार्गदर्शक तत्वे ठरवणे.
6. भविष्यातील परीक्षार्थ्यांसाठी अभ्यासाचे प्रभावी मार्ग व धोरणात्मक शिफारसी (strategic recommendations) मांडणे.

संशोधन पद्धत (Research Methodology) :

सदरील लेखामध्ये वापरलेली संशोधन पद्धत ही विश्लेषणात्मक (Analytical) आणि सर्वेक्षणाधारित (Survey-based) स्वरूपाची आहे. या अभ्यासामध्ये UGC NET (Library and Information Science – LIS) परीक्षेच्या मागील १५ वर्षांतील (2010 ते 2025) प्रश्नपत्रिकांचे सखोल व तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. याशिवाय NET परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासपद्धती, डिजिटल शिक्षणाचे माध्यम, आणि त्याचा वापर याचा सर्वेक्षणातून अभ्यास करण्यात आला आहे.

प्राथमिक माहिती संकलन (Primary Data Collection) :

प्राथमिक माहिती Google Form, WhatsApp गट, Telegram चॅनल्स आणि ई-मेलद्वारे संकलित करण्यात आली. या सर्वेक्षणात देशभरातून 100 NET (LIS) परीक्षार्थी आणि NET Qualified उमेदवार यांनी सहभाग घेतला. या प्रतिसादांतून अभ्यासासाठी वापरले जाणारे डिजिटल प्लॅटफॉर्म, विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे तास, संसाधनांची उपलब्धता, डिजिटल पद्धतींची प्रभावीता, आणि परीक्षेच्या तयारीतील अडचणी यासारख्या बाबींचा तपशील मिळाला.

दुय्यम माहिती संकलन (Secondary Data Collection):

दुय्यम माहिती स्त्रोतांमध्ये मुख्यतः 2010 ते 2025 या कालावधीत झालेल्या UGC NET (LIS) Paper I व Paper II च्या प्रश्नपत्रिका समाविष्ट आहेत. याशिवाय UGC व NTA च्या अधिकृत वेबसाइटवरील मार्गदर्शक सूचना, अभ्यासक्रम, आणि परीक्षाविषयक माहितीसुद्धा संकलित केली गेली. यासोबत संबंधित शैक्षणिक व संशोधन लेख, ब्लॉग्स, शैक्षणिक संस्थांचे प्रकाशन, आणि विविध डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म्सवरील संसाधनांचा

Research Hub International Journal

अभ्यास करण्यात आला.

या दोन्ही प्रकारच्या माहितीच्या एकत्रित विश्लेषणावरून अभ्यासाचे निष्कर्ष व उपयुक्त शिफारसी तयार करण्यात आल्या, ज्यामध्ये UGC NET (LIS) परीक्षेच्या तयारीसाठी डिजिटल शिक्षण पद्धतीचे प्रभावी स्वरूप उलगडले गेले.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा (Scope & Limitations of the Study) :

सदरील अभ्यास Library and Information Science (LIS) या विषयावर केंद्रित असून UGC NET परीक्षेतील पेपर विश्लेषणावर आधारित आहे. अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा खालील प्रकारे निश्चित करण्यात आली आहे:

विषयाची मर्यादा :

अभ्यास फक्त LIS विषयावर आधारित Paper II वर केंद्रित आहे. Paper I (General Aptitude) चा संदर्भ केवळ तुलनात्मक स्वरूपात घेतला गेला आहे.

कालमर्यादा :

अभ्यासात 2010 ते 2025 या १५ वर्षांच्या कालखंडातील UGC NET (LIS) परीक्षेचा विचार केला गेला आहे. या काळात झालेल्या परीक्षांमधील प्रश्नपत्रिका, बदलते प्रश्नांचे स्वरूप, ट्रेंड्स आणि अभ्यासक्रमाचे बदल यांचा सखोल अभ्यास केला आहे.

परीक्षेची व्याप्ती :

अभ्यासात मुख्य भर NTA (National Testing Agency) मार्फत घेतल्या जाणाऱ्या UGC NET परीक्षेवर आहे. NTA ने 2018 नंतर ही परीक्षा घेण्यास सुरुवात केली, त्यामुळे 2010–2018 या कालावधीतील परीक्षांसाठी UGC ची जबाबदारी होती, त्या दोन्ही कालखंडाचा तुलनात्मक विचार अभ्यासात केला आहे.

प्रश्नांचे स्वरूप व तयारीचे माध्यम :

अभ्यासात विद्यार्थ्यांची तयारीची साधने, वापरलेले डिजिटल प्लॅटफॉर्म्स, व तयारीचा वेळ यांचाही अभ्यास केला आहे, जेणेकरून परीक्षेच्या तयारीत आलेले बदल समजता येतील.

डेटा विश्लेषण (Data Analysis) :

हा अभ्यास मुख्यतः दोन भागांमध्ये केलेला आहे — (1) प्रश्नपत्रिका विश्लेषण (2010–2025) आणि (2) विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणावर आधारित विश्लेषण. या विश्लेषणातून UGC NET (Library and Information Science) परीक्षेतील ट्रेंड्स, विद्यार्थ्यांची तयारीची साधने, आणि पारंपरिक विरुद्ध डिजिटल अभ्यासपद्धती यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

Research Hub International Journal

१ प्रश्नपत्रिकांचे युनिटनिहाय विश्लेषण (Unit-wise Analysis of Question Papers).

तक्ता क्र. १: वर्षनिहाय युनिट्सवरील प्रश्नांची संख्या दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	वर्षे	Library Management	Information Sources	ICT in Libraries	Research Methodology
1	2010	4	5	2	2
2	2011	5	4	3	3
3	2012	6	4	2	3
4	2013	5	5	3	2
5	2014	4	4	3	3
6	2015	6	5	4	3
7	2016	7	4	5	3
8	2017	6	4	5	4
9	2018	6	5	5	5
10	2019	5	4	6	5
11	2020	8	4	6	6
12	2021	7	4	7	6
13	2022	6	5	7	7
14	2023	6	5	6	7
15	2024	7	5	7	7
16	2025	8	4	7	8



विश्लेषण :

वरील तक्ता क्र. १ वरून दिसून येते की, २०१० ते २०२५ या कालावधीत घेतलेल्या UGC NET (LIS) परीक्षेतील Paper II मधील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करताना असे आढळले की Library Management, Information Sources, ICT in Libraries आणि Research Methodology ही युनिट्स सर्वाधिक वारंवार विचारली गेली. Library Management या युनिटमधील प्रश्नांची संख्या २०१० मध्ये ४ होती, जी २०२५ मध्ये ८ वर पोहोचली—यातून या घटकाचे सातत्याने वाढणारे महत्त्व दिसून येते. Information Sources या युनिटमधील प्रश्नांची संख्या तुलनेत स्थिर राहिली असून दरवर्षी ४ ते ५ प्रश्न विचारले गेले आहेत.

ICT in Libraries युनिटमधील प्रश्न २०१० मध्ये केवळ २ असताना २०२५ पर्यंत ७ पर्यंत वाढले असून यावरून माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या वाढत्या उपयुक्ततेचे संकेत मिळतात. विशेषतः Research Methodology युनिटमध्ये प्रश्नांची संख्या २०१० मधील २ वरून २०२५ मध्ये ८ पर्यंत गेली असून, हे दर्शवते की शैक्षणिक संशोधन आणि शोधपद्धतीचे NET परीक्षेत वाढते स्थान आहे. एकंदरीत, या विश्लेषणातून असे स्पष्ट होते की पारंपरिक युनिट्सचे महत्त्व जपले गेले असले तरी, तंत्रज्ञान आणि संशोधन यांसारख्या आधुनिक घटकांवरील भर लक्षणीयरीत्या वाढला आहे. त्यामुळे परीक्षार्थींनी या घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करून अभ्यासाची रणनीती आखणे आवश्यक आहे.

२ सर्वेक्षण आधारित विश्लेषण (Survey-based Analysis) :

एकूण 100 परीक्षार्थी (NET तयारी करणारे आणि NET पात्र झालेले दोघेही) यांच्याकडून Google Forms, WhatsApp, Telegram Group व Email च्या माध्यमातून प्रतिक्रिया गोळा करण्यात आल्या. या प्रतिसादांच्या विश्लेषणात खालील मुद्दे विचारात घेण्यात आले:

तक्ता क्र. २: सर्वेक्षण आधारित विश्लेषण दर्शविणारा तक्ता

अ.क्र	अभ्याससाधन (Study Resource)	वापरकर्त्यांची संख्या (१०० पैकी)	टक्केवारी (%)
1	YouTube Learning Series	80	80%
2	Online Apps & Mock Test Platforms	75	75%
3	Telegram Discussion Groups	70	70%
4	पारंपरिक पुस्तके व IGNOU Study Materials	55	55%
5	कोचिंग क्लासेस	25	25%

Research Hub International Journal



विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण आधारित विश्लेषण दर्शविणारा स्तंभालेख क्र. १

विश्लेषण:

वरील तक्ता क्र. २ नुसार सर्वेक्षणात सहभागी झालेल्या 100 UGC NET (LIS) परीक्षार्थ्यांपैकी सर्वाधिक विद्यार्थ्यांनी YouTube Learning Series या माध्यमाचा वापर केल्याचे स्पष्ट झाले (80%). विद्यार्थ्यांनी Paper II विषयक सिरीज नियमित पाहिल्या असून, updated content मिळवण्यासाठी YouTube एक प्रभावी साधन ठरले आहे. Online Apps आणि Mock Test Platforms (जसे की Testbook, Gradeup, Unacademy) हे 75% विद्यार्थ्यांनी वापरले, जे त्यांच्या अभ्यासक्रमाच्या नियोजन, सराव चाचण्या व स्कोअर विश्लेषणासाठी उपयुक्त ठरले. Telegram Discussion Groups हे 70% विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरले, कारण येथे doubt solving, notes शेअर करणे व peer discussion सहज शक्य होते. यामुळे विद्यार्थ्यांना community-based learning अनुभवता आले.

पारंपरिक साधनांमध्ये पुस्तके व IGNOU study materials यांचा वापर 55% विद्यार्थ्यांनी केला. हे विशेषतः concept clarity व reference साठी वापरले गेले. याउलट कोचिंग क्लासेस हे केवळ 25% विद्यार्थ्यांनी वापरले, हे सूचित करते की आधुनिक काळात विद्यार्थ्यांचा कल स्वयंअभ्यास व डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वाढत आहे. या तक्त्याच्या माध्यमातून असे दिसून येते की, डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापराने NET (LIS) परीक्षेची तयारी अधिक सुलभ व प्रभावी झाली आहे. पारंपरिक साधने अजूनही काही प्रमाणात वापरात असली तरी विद्यार्थ्यांचा झुकाव मुख्यतः डिजिटल माध्यमांकडे आहे.

पारंपरिक शिक्षण पद्धती विरुद्ध डिजिटल प्लॅटफॉर्म्सवरील अभ्यास – एक तुलनात्मक विश्लेषण :

या अभ्यासात पारंपरिक व डिजिटल पद्धतीने UGC NET (LIS) परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या फरकांचे विश्लेषण करण्यात आले. विविध घटकांच्या आधारे तुलना केली असता पुढील गोष्टी आढळून आल्या.

Research Hub International Journal

तक्ता क्र. ३: पारंपरिक शिक्षण पद्धती व डिजिटल प्लॅटफॉर्म्सवरील अभ्यास तुलनात्मक विश्लेषण दर्शविणारा तक्ता

घटक	पारंपरिक तयारी	डिजिटल तयारी
स्त्रोत	पुस्तके, कोचिंग क्लासेस	YouTube सिरीज, मोबाईल ॲप्स, मॉक टेस्ट
प्रवेश्यता	मर्यादित (स्थानिक/शारीरिक)	मुक्त व व्यापक (कोठूनही उपलब्ध)
अपडेटेड कंटेंट	तुलनेने कमी	वारंवार अपडेट होणारे
परस्परसंवाद	शिक्षक-केंद्रित	विद्यार्थी समुदाय, चर्चा गट, peer interaction

विश्लेषण:

या तक्त्यातून असे दिसून येते की पारंपरिक पद्धती स्थैर्य व मूलभूत ज्ञान देण्यास उपयुक्त असल्या तरी, डिजिटल पद्धती अधिक लवचिक, अद्ययावत व सहभागात्मक स्वरूपाची ठरते. विद्यार्थ्यांचा कल विशेषतः **YouTube Series, Telegram Groups, व Mock Test Platforms** कडे वाढला असून, डिजिटल शिक्षण पद्धती ही आधुनिक परीक्षांच्या तयारीसाठी अधिक परिणामकारक ठरत आहे.

प्रमुख निष्कर्ष (Major Findings) :

या अभ्यासाच्या माध्यमातून विविध स्तरांवर अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांच्या तयारीची साधने, व अभ्यासपद्धतींचा सखोल अभ्यास करण्यात आला. याचे खालीलप्रमाणे महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले:

१. युनिटनिहाय प्रश्न वितरण हे विश्लेषण दर्शवते की Library Management, Information Sources, आणि ICT in Libraries या युनिट्सवरील प्रश्नांची वारंवारता सर्वाधिक होती. या घटकांचा NET (LIS) परीक्षेतील महत्त्व कायम आहे.

२. Research Methodology आणि Digital Library Initiatives या युनिट्सवरील प्रश्नांची संख्यात्मक वाढ विशेषतः 2018 नंतर दिसून आली, जी उच्च शिक्षणातील डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनशी निगडित आहे.

३. पारंपरिक साधनांपेक्षा विद्यार्थ्यांचा कल डिजिटल माध्यमांकडे अधिक आहे. YouTube Learning Series, NTA Official Apps, Telegram Discussion Groups, इत्यादींचा वापर सातत्याने वाढत आहे.

४. सर्वेक्षणातील प्रतिसादांनुसार, Mock Tests, Previous Year Questions (PYQs), आणि Topic-wise Video Content ही सर्वाधिक प्रभावी तयारी साधने ठरली आहेत. विद्यार्थ्यांच्या यशस्वी तयारीत या साधनांचा वाटा महत्त्वपूर्ण आहे.

५. पारंपरिक शिक्षण संस्था व कोचिंग क्लासेसची माहिती मर्यादित स्वरूपाची असल्याचे आढळले. त्याच्या उलट, डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर विद्यार्थ्यांना संवादात्मक, अद्ययावत व सुलभ पद्धतीने शैक्षणिक साहित्य उपलब्ध होते. यामुळे वेळेचे व्यवस्थापन, स्व-अभ्यास, आणि सहअभ्यास यास चालना मिळते.

शिफारसी व धोरणात्मक उपाययोजना (Recommendations and Policy Interventions): डिजिटल साक्षरतेस प्रोत्साहन देणे:

विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी विश्वविद्यालये व शैक्षणिक संस्था कार्यशाळा, ऑनलाईन

Research Hub International Journal

वेबिनार व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करावे. यामुळे UGC NET परीक्षेची तयारी डिजिटल माध्यमांतून अधिक प्रभावी होईल.

1. **एकत्रित डिजिटल पोर्टलची निर्मिती:** UGC NET (LIS) संदर्भात सर्व अभ्याससामग्री, PYQs, मॉक टेस्ट्स आणि व्हिडीओ लेक्चर्स एकाच ठिकाणी उपलब्ध असणारे अधिकृत आणि ओपन-सोर्स पोर्टल तयार करणे आवश्यक आहे, जे सरकारी पातळीवर निःशुल्क उपलब्ध असेल (Kulkarni et al., 2022).
2. **समूहाधारित डिजिटल शिक्षणाचे समर्थन:** Telegram, WhatsApp, Discord सारख्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना समुदायात्मक शिकण्याचे वातावरण मिळते. अशा प्लॅटफॉर्म्सना शैक्षणिक संस्थांनी अधिकृत मान्यता व मार्गदर्शन दिल्यास त्यांचा प्रभाव अधिक वाढू शकतो.
3. **पारंपरिक व डिजिटल पद्धतीचे मिश्र शिक्षण (Blended Learning):** UGC NET सारख्या परीक्षांमध्ये पारंपरिक मार्गदर्शनासह ऑनलाईन संसाधने एकत्रित करून 'Blended Learning' मॉडेल वापरणे अधिक फायदेशीर ठरू शकते. यामुळे वैयक्तिक शिकण्याचा वेग व प्रवेश्यता वाढेल
4. **अभ्यासक्रम सुधारणा व अद्यतन:** NTA व UGC ने परीक्षेच्या अभ्यासक्रमात सातत्याने बदल व अद्यतन आवश्यक आहेत. त्याचबरोबर परीक्षा घेण्याच्या पद्धतीतही डिजिटल अभिमुखता असावी.
5. **मोफत व दर्जेदार संसाधनांची निर्मिती:** विद्यार्थ्यांना विश्वासार्ह व दर्जेदार मटेरियल उपलब्ध व्हावे यासाठी विद्यापीठे, शैक्षणिक मंडळे व नामांकित संस्था एकत्रित येऊन सामग्री विकसित करावी.

समारोप (Conclusion) :

२०१० ते २०२५ या पंधरा वर्षांच्या कालावधीत UGC NET (LIS) परीक्षेच्या स्वरूपात झालेल्या लक्षणीय बदलांचा मागोवा घेतल्यावर असे स्पष्ट होते की, ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या अभ्यासक्रमात सातत्याने नव्या संकल्पना, तंत्रज्ञान व संशोधनविषयक घटकांचा समावेश होत आहे. प्रश्नपत्रिकेतील युनिटनिहाय प्रश्नांचे वितरण, ICT, Open Access, Metadata, Digital Libraries अशा आधुनिक घटकांची वाढती उपस्थिती, आणि पारंपरिक घटकांची पुनरावृत्ती या सर्व बाबी अभ्यासकांच्या अभ्यासदिशा ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

सर्वेक्षणाच्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की, आजचे विद्यार्थी पारंपरिक तयारीच्या जोडीने डिजिटल शिक्षण साधनांवर अधिक अवलंबून आहेत. मोबाइल ॲप्स, यूट्यूब चॅनेल्स, ऑनलाइन टेस्ट सिरीज, व डिजिटल नोट्स यांचा प्रभावी वापर त्यांच्या यशात महत्त्वपूर्ण ठरत आहे. याशिवाय, एकत्रित (Blended Learning) पद्धती, समूहचर्चा, व AI-आधारित अभ्याससाधने यांची गरज उमेदवारांमध्ये वाढत आहे. या अभ्यासातून स्पष्ट होते की, भविष्यातील परीक्षार्थ्यांसाठी केवळ अभ्यासक्रम समजून घेणे पुरेसे नाही, तर बदलत्या अभ्यासपद्धती आणि तांत्रिक उपयोजनांची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. विश्वासार्ह डिजिटल पोर्टल्स, मार्गदर्शक वेबिनार्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित वैयक्तिक सल्लागार प्रणाली, आणि एकत्रित शिक्षण (blended learning) या सर्व गोष्टी भविष्यातील यशस्वी NET तयारीचे महत्त्वाचे घटक ठरू शकतात.

संदर्भसूची :

- गवई, एन. जी. (2021). नेट परीक्षेतील ट्रेंड विश्लेषण: मागील दशकाचा आढावा. शोधविचार संशोधन

पत्रिका, 7(2), 15–20.

- जोशी, ए. एस. (2021). यूजीसी नेट परीक्षा: तयारीची आधुनिक दिशा. पुणे: शैक्षणिक प्रकाशन.
- देशमुख, पी. आर. (2022). यूजीसी नेट ग्रंथालय शास्त्र विषय: पेपर विश्लेषण आणि रणनीती. ज्ञानप्रबोधिनी मासिक, 12(5), 24–29.
- थोरात, आर. डी. (2018). डिजिटल शिक्षणाचे साधन आणि NET परीक्षेवरील परिणाम. शैक्षणिक संवाद, 10(3), 45–50.
- पाटील, के. एन. (2020). नेट परीक्षेतील यशासाठी विद्यार्थ्यांची अभ्यास पद्धती. नाशिक: उदय पब्लिकेशन्स.
- सावंत, एम. डी. (2023). ग्रंथालय विज्ञानातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक. औरंगाबाद: पुस्तक मित्र प्रकाशन.
- कुलकर्णी, एस. जी. (2019). ग्रंथालय व माहितीशास्त्र: एक अभ्यास. मुंबई: सावंत अकेडमिक्स.
- Babu, B. R., & Sarangapani, R. (2022). Changing trends in UGC-NET (Library and Information Science): A content analysis. Journal of Library & Information Science, 17(1), 45–52.
- Ghosh, M. (2019). Library and Information Science education in India: Current status and future perspectives. DESIDOC Journal of Library & Information Technology, 39(6), 345–351. https://doi.org/10.14429/djlit.39.6.14667
- Gupta, D. K., & Kabra, N. (2020). MOOCs in Library and Information Science in India: An analytical study. Journal of Information and Knowledge, 57(1), 1–9.
- Kumar, P., & Garg, A. (2020). An evaluation of digital learning platforms in higher education with MOOCs perspective in India. International Journal of Advanced Science and Technology, 29(7), 12868–12888.
- Kumar, P., & Rani, S. (2021). Digital tools and strategies used for UGC-NET (LIS) preparation: A survey among aspirants. International Journal of Information Science, 9(2), 72–81.
- Lihitkar, R. S., Naidu, A., & Lihitkar, R. L. (2013). E-learning programmes in library and information science: Worldwide initiatives and challenges for India. Library Hi Tech News, 30(9), 12–20.
- Mahapatra, R. K., & Mishra, S. (2020). Impact of online platforms on NET/SET examination preparation: A study of LIS students. Library Progress (International), 40(1), 20–28. https://doi.org/10.5958/2320-317X.2020.00003.2

Research Hub International Journal

- Ministry of Education, Government of India. (2017–2025). SWAYAM – Study Webs of Active Learning for Young Aspiring Minds.
- Ministry of Education, Government of India. (2025). National Digital Library of India.
- Mukherjee, S., & Patra, S. K. (2023). Digital library initiatives in India: A comprehensive study. arXiv. https://arxiv.org
- Pal, S. K. (2012). Role of digital libraries in the development of distance education in India. In Emerging Technology in Library & Information Science. Arthava Publishers.
- Rajput, P. S. (2020). Evolution of UGC-NET in Library and Information Science: A longitudinal study from 2005 to 2020. Library Herald, 58(3), 210–221.
- Sharma, A. (2018). UGC-NET examination reforms and changing pattern: A critical review. Knowledge Librarian, 5(2), 60–68.
- Sridevi, K., & Surendra Babu, K. (2018). Integration of ICT in higher education: A focus on library science. Library and Information Science Research, 8(2), 43–49.
- Subaveerapandiyan, A., & Ahamed, F. A. (2022). Awareness and usage of SWAYAM course among library and information science students: A survey. arXiv. https://arxiv.org
- Subaveerapandiyan, A., Rajitha, A., Dar, M. A., & Natarajan, R. (2022). E-resource management and management issues and challenges. arXiv. https://arxiv.org
- The Times of India. (2025, July). Equip libraries with digital resources, governor advises state universities.
- The Times of India. (2025, July). Sanskrit universities to link up via shared digital library.
- Wikipedia. (2025). National Programme on Technology Enhanced Learning (NPTEL).
- e-ShodhSindhu Consortium, Ministry of Education, Government of India. (2025). National-level resource sharing initiative.

Research Hub International Journal